# फुलपाखरांची बाग

## परागवाहकांचे नंदनवन

तुम्हाला माहीत आहे का? भारतात सुमारे १३२० फुलपाखरांच्या प्रजाती आहेत, त्यापैकी २७१ प्रजाती महाराष्ट्रात आणि १६० जाती मुंबईत आढळतात.



हळदीकुंकू (कॉमन जझबेल)

### तुम्ही कशी मदत करू शकता?

रासायनिक पदार्थांच्या वापरामुळे शहरातील बागांमध्ये अनेकदा परागीकरण करणारे कीटक कमी प्रमाणात दिसतात. कीटकनाशक आणि रासायनिक खते टाळल्यास फुलपाखरे तुमच्या घराच्या खिडकीच्या चौकटीतही आकर्षित होऊ शकतात. इथे दिलेल्या झाडांची माहिती वापरून तुमच्या घरी किचन गार्डन किंवा फुलपाखरांची बाग सुरू करा.




रूईकर फुलपाखराची अळी हळदीकुंकवाच्या झाडाची पान खाताना

**DID YOU KNOW ?**

बटरफ्लाय हे नाव कसे पडले याबद्दल असं मानलं जातं की, जेव्हा लोकांना पिवळट-पांढरे पंख असलेले ब्रिमस्टोन फुलपाखरू मोठ्या संख्येने उडताना दिसली, तेव्हा लोकांनी त्यांच्या रंगाची तुलना लोण्या (butter) सोबत केली, ज्यामुळे त्यांना हे नाव मिळालं.



Brimstone Butterfly




फुलपाखरे ओळखण्यासाठी iButterflies मोबाईल अॅप डाउनलोड करा.


इंग्रजीसाठी येथे स्कॅन करा





### फुलपाखरांची बाग म्हणजे नक्की काय?

फुलपाखरांची बाग ही फुलपाखरांसाठी मधुरस वनस्पती आणि अळ्यांसाठी खाद्य वनस्पती लावून फुलपाखरांच्या संवर्धनासाठी तयार केलेली एक विशिष्ट प्रकारची बाग आहे. ही बाग ३० प्रजातींच्या ३०० रोपांसह एक कीटकनाशक मुक्त अधिवास आहे. ह्या बागेत मधुरस न पिणाऱ्या फुलपाखरांसाठी पिकलेली फळं असलेला बटरफ्लाय फीडर, आणि फुलपाखरांना आवश्यक खनिजं शोषून घेण्यासाठी एक छोटं डबकं आणि चिखलाचा कोपरा देखील आहे.

### फुलपाखरांना आकर्षित करणाऱ्या वनस्पती



ब्लू स्नेक वीड, ज्याला जमैकन स्पाइक म्हणूनही ओळखले जाते, ही एक मधुरस वनस्पती आहे जी मधमाश्या, फुलपाखरे आणि पक्ष्यांना आकर्षित करते.



पेंटास एक आकर्षक, मधुरसाने भरलेली वनस्पती आहे जी आपल्या भडक रंगांच्या फुलांनी बागेची शोभा वाढवते.



ऑफिस टाइम ची फुले आणि पाने, दोन्ही फुलपाखरांना आकर्षित करतात; फुलपाखरांसाठी मधुरस आणि आळ्या साठी खाद्य म्हणून कार्य करते, तसेच मधमाश्यांना देखील आकर्षित करते.



रुएलिया ही पॅन्सी (भिरभिरी) फुलपाखरांची खाद्य वनस्पती आहे. या वनस्पतीची फुले तीन रंगात आहेत; पांढरा, गुलाबी आणि निळा.

### फुलपाखरांची बाग कशाप्रकारे कार्य करते?


फुलपाखरांना आकर्षित करण्यासाठी फुलपाखरांच्या बागेत काही विशिष्ट झाडे लावली जातात ; त्यांना खाण्यासाठी मधुरस आणि अंडी घालण्यासाठी योग्य वनस्पती पुरवतात. अंड्यातून अळी बाहेर येते, ती पाने खाऊन मोठी होते आणि नंतर कोषावस्थेत (प्युपा) जाते. काही दिवसांनंतर प्युपा मधून, फुलपाखरू बाहेर येतो. असा हा जीवनक्रम पूर्ण होतो आणि ही प्रक्रिया चालू राहते.

फुलपाखरे हे निसर्गातील सर्वोत्तम वनस्पतिशास्त्रज्ञ आहेत - हे तुम्हाला माहीत आहे का? त्यांचा पायाच्या तळव्यावर संवेदनशील भाग (सेन्सर) असतात, आणि वनस्पती ची ओळख करण्या साठी ते आपल्या पायाने त्या वनस्पती ची "चव" घेतात आणि नंतर त्या झाडावर अंडी घालतात. बहुरुपी (कॉमन मॉर्मन) फुलपाखरू एकतर लिंबू किंवा कढीपत्ता वनस्पती ची निवड करतो कारण कि या दोन्ही वनस्पती एकाच रुटेसी वनस्पती कुटुंबातील आहेत!



लिंबाळी फुलपाखराचे जीवनचक्र

### काही वैशिष्ट्येपूर्ण फुलपाखरे



**छोटा चांदवा**

ह्या फुलपाखराची मादी बेचव असलेल्या रूईकर फुलपाखराची नक्कल करते.



**विमुक्ता**

हे फुलपाखरू शहरात तसेच वनात सुद्धा आढळते.



**नवाब फुलपाखरू**

कधीही फुलांवर दिसत नाही, परंतु जास्त पिकलेले फळ किंवा मृत खेकडा नक्कीच आकर्षित करेल



**निल रूईकर**

हे फुलपाखरू पक्ष्यांसाठी बेचव आहे.





### राज्य फुलपाखरू

राणी पाकोळी (ब्ल्यू मॉरमॉन) फुलपाखराला जून २०१५ मध्ये महाराष्ट्र राज्याचे राज्य फुलपाखरू म्हणून घोषित करण्यात आले, जे राज्याच्या समृद्ध जैवविविधतेचे प्रतिनिधित्व करते.

### शहरातील फुलपाखरू

बहुरूपी हे बृहन्मुंबई मध्ये सर्वाधिक दिसणारे फुलपाखरू आहे, कारण ते लिंबू आणि कढीपत्ताच्या झाडांवर अंडी घालते.

**पिंक टायगर**

पतंगाची आळी खुळखुळ्याची पाने खाते, ज्यामुळे रस बाहेर येतो. आणि या रसावर रुईकर फुलपाखरे आकर्षित होतात.





### अद्भुत वनस्पती

खुळखुळा ही मधुरस किंवा खाद्य वनस्पती नसली, तरी रूईकर फुलपाखरे त्याच्या रसाकडे मोठ्या संख्येने आकर्षित होतात.